जाहिरात

# ड्राय आईज डोळ्यांचा कोरडेपणा

डोळ्यांचा कोरडेपणा हा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो. डोळ्यातील अश्रूंचे प्रमाण कमी होऊन डोळे कोरडे होतात. डोळे लालसर होणे, डोळ्यातून सतत पाणी येणे, डोळ्यात सतत काही खुपते असे वाटणे, डोळ्यात काही गेले असावे असे वाटणे ही ड्राय आईज आजाराची लक्षण आहेत.

डोळ्यांच्या कोरडेपणात खाज येणे, डोळे दुखणे, उजेड सहन न होणे असे होते. काही वेळा डोळ्यांची उघड-मीट करणे ही अशक्य होते. अश्यावेळी ड्राय आईज आजारावर तातडीने उपचार करणे गरजेचे असते. या आजारचे निदान करण्यासाठी काही तपासण्या (Test) करणे आवश्यक असते. टिअर फिल्म ब्रेकअप टेस्ट, Schirmers test व Meibograhy ही डोळ्यांचा कोरडेपणा तपासण्यासाठी Advance टेस्ट सुद्धा डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटरमध्ये होते. या व्यतिरिक्त अन्य काही तपासण्या नेत्र तज्ज्ञ करतात. आणि त्यानुसार ट्रीटमेंट केली जाते.

निसर्गतः डोळ्यांचा कोरडे पणा कमी करण्याचे काम अश्रू करत असतात. अश्रूंमुळे डोळे ओले राहतात. डोळ्यांचं ओलसरपणा टिकून राहतो. आपण डोळ्यांची उघड-झाप करतो त्यामुळे डोळे थंड राहण्यास मदत होते. डोळ्यात



**डॉ. उदय गाडगीळ**
**डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटर**

होणारे बदल हे डोळयांची उघड-झाप करताना लक्षात येतात. त्यानुसार आजाराचे निदान करता येते.

डोळ्यांच्या ग्रंथी अश्रू तयार करत असतात. अश्रूंमुळे पापणी आणि डोळा याचे घर्षण होत नाही. ओलावा पापणी-डोळ्यांची हालचाल स्मूथ होण्यासाठी मदत करतो. या अश्रुंचे तीन स्तर असतात. या तीन स्तरांपैकी एक स्तरात बदल झालं तरी आजार उदभवतो.

यंग जनरेशनचा स्क्रीन टाइम वाढला आहे. लॅपटॉप, मोबाईल याच्या वापराने डोळ्यांवर परिणाम होतो. त्यातून ही ड्राय आईज होण्याचे प्रमाण वाढते. स्क्रीन टाईमच्या शिवाय फॅनच्या खाली जास्त वेळ बसणे, एसी मध्ये अधिक वेळ बसणे, कामानिमित्त उन्हात फिरावे लागणे यामुळे ही डोळ्यांचा कोरडेपणा वाढून विकार होतो. संधिवात, थायरॉईड सारख्या काही आजारामुळे डोळ्यांचा ड्रायनेस वाढतो.

तज्ज्ञ, अनुभवी डॉक्टरां कडून तपासणी करून घेऊन त्यांच्या सल्ल्याने आय ड्रॉप्स वापरून ड्राय आईज आजार नियंत्रित करू शकतो. तसेच स्क्रीन टाईम कमी करून डोळ्यांचा कोरडेपणा नियंत्रित करू शकतो. आर्थराइटिस, थायरॉईड सारख्या आजारांचे योग्य निदान करून त्यावर उपचार घेऊन ड्राय आईजवर मात करता येते. डोळ्याच्या कोरडेपणाची तीव्रता वाढली तर ऑपरेशन करावे लागते.

डोळ्यांच्या कोरडेपणाच्या उपचारासाठी इंटेन्स पल्स लाईट थेरपी ही नवीन उपचार पध्दती वापरली जाते. Intense Pulsed Light नॉन लेझर सोर्स आहे. या नवीन उपचार पध्दतीने प्रकाशाचे नियंत्रण करता येते. त्वचेच्या रंगानुसार या उपचाराचे पॅरामीटर्स ठरवता येतात. या प्रक्रियेत अपारदर्शक गॉगल्सचा वापर करून रुग्णांच्या डोळ्यांचे संरक्षण केले जाते. अल्ट्रासाऊंड जेलचा वापर केला जातो.

डॉक्टर गाडगीळ आय हॉस्पिटलमध्ये ड्राय आईज म्हणजे डोळ्यांचा कोरडेपणा यावर उपचार केले जातात. अचूक तपासणी करून योग्य प्रकारे उपचार देऊन डोळ्यांचा कोरडेपणातून रुग्णांना दिलासा दिला जातो.

**डॉ. गाडगीळ डोळ्यांचे हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटर :** १ ला मजला, पॅरेडाईज टॉवर, मॅकडोनाल्डच्या बाजूला, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.)

**डॉ. गाडगीळ डोळ्यांचे हॉस्पिटल :** श्रेयस अपार्टमेंट, हनुमान डेअरीजवळ, रामचंद्रनगर, ठाणे (प.)

**अपॉइंटमेंटसाठी संपर्क : 9820003756 / 9820004756 / 9820017487**

**Cashless Facility Available**